ISSN 2249-894X Impact Factor : 3.8014 (UIF) Volume - 6 | Issue - 2 | November - 2016

Review Of Research

# नारायण सुर्वे : समाज परिवर्तनाचे स्वप्न बाळगणारा कवी

प्रा.डॉ.बाळासाहेब गार्डी
पदव्यूत्तर मराठी अध्ययन व संशोधन केंद्र,
रा.ब.नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर

1960 नंतरच्या कवीमध्ये नारायण सुर्वे हे एक अत्यंत महत्वाचे कवी म्हणून ओळखले जातात. सुर्वेच्या काव्यलेखनाला 1956 पासून सुरूवात झालेली आहे. त्यांच्या अगदी पहिल्या काव्यसंग्रहापासूनच त्यांच्या कवितेचे वगळेपण, तिचे स्वतंत्र्य अस्तित्व तयार झालेले दिसून येते. सुर्वे हे महाराष्ट्रातील श्रमजीवी वर्गाचा जीवनानुभव घेणारे कवी आहेत. साम्यवादावर त्यांची प्रखर निष्ठा आहे. स्वत: कम्युनिष्ठ पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते असल्याने त्यांच्या कवितेला एक वैशिष्टपुर्ण रंग, गंध आणि आकार प्राप्त झालेला आहे.

1960 चा काळ म्हणजे स्वातंत्र्यकाळात तरूण झालेल्या पिढीचा काळ. ही पिढी चहुवार असहायतेने, असुरक्षिततेने ग्रासलेली असताना आशेचा, लढयाचा सूर असलेली सुर्वेची कविता आली. 1960 च्या पुर्वीची कविता शब्दनिष्ठ होऊ लागलेली असताना मराठीतील लोकगीतांच्या जवळपास जाणारी सुर्वेची कविता वेगळी उठून दिसली. तसेच मध्यमवर्गीय जाणीवा प्रक्षेपित करणा-या कवितेला छेद देऊन कवितेला समाजसन्मुख बनवले. तसेच बोली भाषेला जवळचे असे रूप दिले. दैनंदिन गरजेसाठी व आपल्या हक्कासाठी, अस्तित्वासाठी झगडणारा माणूस या कवितेच्या केंद्रस्थानी आहे. 1962 रोजी त्यांचा 'ऐसा गा मी ब्रम्ह' हा पहिला कवितासंग्रह प्रकाशित झाला. त्यानंतर माझे विद्यापीठ, जाहीरनामा, नव्या माणसाचे आगमन इ. कवितासंग्रह प्रकाशित झाले.

नारायण सुर्वेच्या कवितेचे विश्व हे नाहीरे (कामगार) वर्गाचे आहे. शोषणाखाली चिरडला गेलेला हा नाहीरे वर्ग साहित्यात पुर्वी तसा उपेक्षितच राहिला होता. सुर्वेनी त्याला आपल्या कवितेचे केंद्र केले आणि मराठी कवितेचा चेहरा मोहरा बदलून टाकला. समग्र समाजपरिवर्तनाचे एक स्वप्न या कवितेच्या मुळाशी आहे. व्यथांचे चित्रण करणे हा सुर्वेचा विषय आहे. परंतु या व्यथा मांडताना कवी कुठेही निराश, अगतिक व दुबळा बनलेला दिसत नाही. पराभवाच्या कसोटीचे अनेक क्षण येऊनही त्यातून वाहेर पडण्याची एक नवी उमेद, जिंकण्याची अलौकिक जिद्द आणि जीवनाचा घेतलेला रोखठोक अनुभव सुर्वे च्या कवितेत दिसून येतो.

'चार शब्द' ही कविता कविच्या जीवनाशी घनिष्ठ संबंध दर्शविणारी कविता आहे. जीवनातील संघर्ष हिच कवीच्या काव्यनिर्मितीमागची प्रमुख प्रेरणा आहे. त्यांच्या जीवनाशी कवितेचे अतुट नाते निर्माण झालेले आहे. जीवनाच्या कडेकडेने त्यांची कविता वाटचाल करीत नाही तर प्रत्यक्ष जीवनसंघर्षातून ती फुलत राहिली आहे. कवी जसा जगत आहे. तसाच तो कवितेमध्ये ठाशीवपणे व्यक्त झालेला आहे. हे जगणे तापदायक आणि



पिढयांपिढया असल्यामुळे आता सुर्वेच्या काव्याच्या रूपाने जणू एका नव्या तुफानाची, नव्या युगाची जाणीव त्यांच्या कवितेच्या सुरवातीपासूनच होत आहे .

कामगार आहे मी तळपती तलवार आहे
सारस्वतानो! थोडासा गुन्हा करणार आहे

अशी ललकारी नव्या तुफानाची, नव्या युगाची जाणीव करून देणारी आहे . कवी आयुष्याने दिलेल्या चटक्यांबद्दल कसलीही कटुता न ठेवता जीवनाइतकीत रस धगीने संपन्न कविता लिहितो . थोडासा गुन्हा करण्याचे धाडस दाखवितो .

सुर्वेनी आयुष्यात जे पाहिले, भोगले त्या एका संपुर्ण यातनामय जगाची एक तीव्र वेदनाच त्यांच्या या कवितेत मुकपणे व्यक्त झालेली आहे . ही वेदना कवीच्या वैयक्तिक जीवनामधील असली तरी ती केवळ त्यांच्या एकटयाची नाही कारण -

एकटाच आलो नाही युगाचीही साथ आहे
सावध असा तुफानाची हीच सुरवात आहे

आजपर्यंत दडपल्या गेलेल्या वेदनेचा आकार,रंग,रूप या कवितेच्या रूपाने असा व्यक्त झालेला आहे . या वेदनेला तिचा असा खास शब्द सापडलेला आहे . भाकरीच्या पलीकडचे काहीतरी मिळविण्यासाठीच कवीचे जग आज राजमुद्रा घडवीत आहे .

'दोन दिवस' ही सुर्वेची आत्मनिवेदनपर कविता आहे . ती त्यांच्या जीवनाशी सहज संवाद साधणारी आहे . -

दोन दिवस वाट पाहण्यात गेले, दोन दु:खात गेले
हिशोब करतो आहे . किती राहिलेत डोईवर उन्हाळे

असा जीवनाचा आलेख कवीने येथे मांडलेला आहे . हा एक प्रकारे कवीने स्वत:च्या आयुष्याचाच घेतलेला शोध आहे . स्वत:ला शोधण्यातच कवीचे अर्धे अधिक आयुष्य निघून गेले . दोन दिवस वाट पाहण्यात गेले . डोन दु:खात गेले . आयुष्याचे सर्वस्व म्हणजे हे हात . ते तर सदैव दारिद्रयाकडेच गहाण राहिले आणि या दुनियेचा सारखा विचार करता करता दु:ख पेलावे कसे, जगावे कसे हे देखील या दुनियेच्या शाळेतच शिकायला मिळाले . म्हणूनच कवी म्हणतो -

झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले
दोन दिवस वाट पाहण्यात गेले, दोन दु:खात गेले

सुर्वेच्या कवितेतून आत्मप्रत्ययाची भेदक, क्वचित कडवट अशी जाणीव व्यक्त झालेली आहे . ही जाणीव जीवणाच्या रखरखीत वास्तवातून पोळून निघालेली आहे . संपुर्ण आयुष्यात कुठेही स्थिरता लाभलेली नाही . अशा अस्थिर आयुष्याच्या बाबतीत कवीने वापरलेल्या "भाकरीचा चंद्र, कलम झालेले हात, झोतभट्टीत पोलादाप्रमाणे शेकावे लागणारे आयुष्य" या प्रतिमांनी कवीच्या जीवनाचे दाहक प्रतिबिंब ठळकपणे टिपलेले आहेत . वास्तव जीवनातील कठोर सत्याला रोखठोकपणे व अस्सलपणे सामोरी जाणारी सुर्वेची कविता वैशिष्टयपुर्ण आहे .

सुर्वेच्या कवितेमागे त्यांच्या कठोर, दाहक अशा अनुभवांचे विश्व उभे आहे . ते व्यक्त करीत असताना कवीने आपल्या मनाच्या हळुवार व भावकोमल वृत्तीही जपलेल्या आहेत . कवी आपल्या पत्नीकडे केवळ भोगवस्तू म्हणून न पाहता एक व्यक्ती म्हणून, माणूस म्हणून, पुरूषासोबत संघर्षात उतरणारी शक्ती म्हणून, साथी म्हणूनच पाहताना दिसतो . कवीच्या वाटयाला आलेल्या आयुष्यामुळे त्यांच्या कवितेतून वेगळया प्रकृतीचे स्त्री-पुरूष प्रेम व्यक्त झालेले आहे .

'तोवर तुला मला' ही कविता प्रेयसीला उद्देशून लिहिलेली असली तरी ती प्रेमकविता नाही . या कवितेत प्रेयसी आहे . प्रीती आहे . पण त्याचे रूप कवीला प्राप्त झालेल्या जीवनाच्या धगधगत्या आणि रखरखत्या वास्तवात पार वेगळेपणाने उजळून निघाले आहे .

तुझे कुंतलही आताच विंचरून ठेव
अंबाडयाच्या पेडात फुले मी खोवीन

जीवनाच्या वादळी रणामध्ये वास्तविक पाहता नाजुक भावांचे लालन पालन करणे हे तसे पाहिले तर अवघडच ठरते. पण अतिशय व्याकुळ करणा-या आणि सरळ सारख्या अशा वाणीमध्ये कवीने -

फुले हुंगीतच जाऊ दोघेही गर्दीतून
तुझी रेशमासम बोटे दंडात ठेव

हा जो आधार मागितला आहे. तो हेलावून टाकणारा आहे. त्याचप्रमाणे -

आणखी एक काम करावे तू लगेच
फाटक्या कोटासही टाके घालून ठेव

अशी वास्तवातून पार जाण्याची ताकदही तिच्या प्रेमातूनच कवीला लाभत आहे. तिच्या प्रितीचा या जीवनाला केवढा आधार आहे आणि म्हणूनच आज दु:ख असले तरी उदया येणा-या सुखासाठी ते भोगण्याची कवीची तयारी आहे.

दारावर येतील सोनेरी मनोरथ
तोवर प्रिये वाट पाहिलीच पाहिजे

असे तो म्हणतो उदयाच्या भावी जीवनात सोनेरी मनोरथ साकार होईपर्यंत तिनेही जिद्द धरली पाहिजे असा आशावाद कवीने व्यक्त केलेला आहे. सौख्याची ईच्छा, स्वप्नांचे सुंदर रंग केवळ श्रीमंतानाच असतात असे नाही. कधी कधी दारिद्रयातसुद्धा मुलायम स्वप्ने फुलत असतात. याची साक्ष या कवितेत ठळकपणे पटते.

नारायण सुर्वे हे कम्युनिस्ट पक्षाचे अनेक वर्षे कार्यकर्ते होते. त्यांच्या या विशिष्ट वर्गीय स्थानामुळे आणि राजकीय कृतिशीलतेमुळे त्यांच्या कवितेला एक वैशिष्ट्यपुर्ण रंग, गंध आणि आकार प्राप्त झालेला आहे. हा आकार 'कार्ल मार्क्स' या कवितेत ठळकपणे प्रकट झालेला आहे. मार्क्सवादाविषयी अथवा क्रांतीविषयी ठोवळ विधाने न करता प्रत्यक्ष जीवनातील एखादया अनुभवाच्या पार्श्वभुमीवर मार्क्सवादी जाणीव सुचित करणारी ही कविता आहे. कवीची कृती समाजमनाशी नाते जोडणारी आहे. कम्युनिस्ट चळवळीशी, जन आंदोलनाशी त्याचे प्रत्यक्ष नाते आहे. म्हणून कवीच्या कवितांतर्गत अनुभवांचे संदर्भविश्व असणा-या कष्टक-यांच्या जगाचा संदर्भ असणे अपरिहार्य आहे. या कवितेत हा संदर्भच -

तर या मंदीचे कारण काय?
दारिद्रयाचे गोत्र काय?

अशा प्रश्नात्मक स्वरूपात प्रकट झालेला आहे. या कवितेतील कवीचा आतला आवाज अधिकच गंभीर, खोल आणि शांत आहे. कवीच्या व्यक्तिमत्त्वाचा एक शांत व मानवसन्मुख दृष्टिकोन येथे ठळकपणे व्यक्त झालेला आहे. तो असा -

आता इतिहासाचे नायक आपणच आहोत
यापुढच्या सर्वच चरित्रांचेही

कार्ल मार्क्स सारख्या एका महान व्यक्तिमत्त्वाकडे वेगळया पातळीवरून पाहण्याचा हा प्रयत्न आहे. मार्क्सच्या मानवीपणावर भर देण्याची कवीची प्रवृत्ती येथे ठळकपणे प्रत्ययास येते. कवीचा आशावादही वेगळया तात्विक पातळीवर आहे. या आशावादाला जागतिक क्षेत्रातील कामगारांचे वर्गलढे व यशस्वी समाजवादी क्रांत्या यांचा आधार आहे.

कष्टक-यांच्या उपेक्षितांच्या जगातील वास्तव कवीने सुचकपणे अधोरेखित केलेले आहे. विषम समाजरचनेने आपल्या जीवनावर केलेले वार ते उघडयावर मांडतात आणि वाचकांच्या मनात सध्याच्या समाजपद्धतीविषयी संतापही निर्माण करतात. जीवनानुभवातून निघालेल्या ख-याखु-या निष्कर्षांना एक प्रकारचे वजन, भारदस्तपणा व सामर्थ्य याठिकाणी प्राप्त होताना दिसते.

### संदर्भ ग्रंथ :

1. मराठी कविता : परंपरा आणि दर्शन - संपादक - रवींद्र शोभणे
2. कविता फुलते अशी - संपादक - वा. रा. ढवळे, विजय नागपूर
3. अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास -